# सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ

(पूर्वीचे पुणे विद्यापीठ)

दूरध्वनी क्रमांक :
०२०- २५६९१२३३
२५६०१२५७
२५६०१२५८
२५६०१२५९

शैक्षणिक विभाग
गणेशखिंड, पुणे-४११००७
टेलिग्राफ : 'युनिपुणे'
फॅक्स : ०२०-२५६९१२३३
वेबसाइट : www.unipune.ac.in
इ-मेल: dyracademic@unipune.ac.in

संदर्भ : शैसंकी/७२८

दिनांक : ०८/०५/२०१६

सर्व प्राचार्य / सचिव
संलग्नित महाविद्यालये / मान्यताप्राप्त संस्था
पुणे, अहमदनगर व नाशिक

विषय : शैक्षणिक वर्षाचे शिक्षक मान्यतेचे प्रस्ताव शैक्षणिक वर्ष २०१६-१७ पासून दि. १ जून ते दि. ३० सप्टेंबर या कालावधीत सादर करण्याबाबत...

महोदय,

सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाच्या शिक्षकांसंदर्भातील परिनियम क्र. ४१५ मध्ये संलग्नित महाविद्यालये / मान्यताप्राप्त संस्था यांमधील रिक्त शिक्षकी पदे कायमस्वरूपी भरण्याची तरतूद नमूद केलेली आहे व तात्पुरत्या स्वरूपामध्ये जी रिक्त पदे भरावयाची आहेत त्याबाबतचा उल्लेख परिनियम क्र. ४१५ (३) मध्ये केलेला आहे.

उपरोक्त नमूद परिनियमामध्ये जी पदे सहा महिने कालावधीसाठी भरावयाची आहेत अशी पदे ही संबंधित संलग्नित महाविद्यालयांचे प्राचार्य / मान्यताप्राप्त संस्थांचे संचालक यांच्या शिफारशीवरून त्या महाविद्यालयाचे नेमणूक प्राधिकारी (Competent Authority) करतात.

जी पदे एका सत्रापेक्षा जास्त परंतु एक वर्षापर्यंतच्या कालावधीसाठी भरावयाची आहेत अशी पदे स्थानिक निवड समितीमार्फत भरण्यासंदर्भातील तरतूद परिनियम क्र. ४१५ (३) मध्ये नमूद केलेली आहे.

परिनियम क्र. ४१५ (३) मध्ये ही रिक्त शिक्षकी पदे तात्पुरत्या स्वरूपात भरावयाची असतील तर अशा वेळेस या परिनियमाद्वारे सदर पदे भरण्यात यावी असा उल्लेख आहे. परंतु काही संलग्नित महाविद्यालये / मान्यताप्राप्त संस्था प्रति शैक्षणिक वर्षासाठी परिनियम क्र. ४१५ (३) अनुसारच शिक्षकांची पदे भरतात व गेली अनेक वर्षे या महाविद्यालयात कायमस्वरूपी शिक्षकांच्या पदभरतीची संपूर्णपणे कार्यवाही करून पदभरती केल्याचे आढळून येत नाही. स्थानिक चौकशी समितीच्या असंख्य अहवालांमध्ये रिक्त शिक्षकी पदे, विद्यार्थीसंख्या व शिक्षक यांच्या विहीत गुणोत्तरानुसार भरण्यात यावीत अशी अट नमूद केलेली आहे. मा. संचालक, तंत्र शिक्षण यांनीही व्यावसायिक महाविद्यालये विशेषतः अभियांत्रिकी महाविद्यालयांमध्ये शासनाच्या समित्या गठित करून महाराष्ट्रातील सर्व अभियांत्रिकी महाविद्यालयांची तपासणी करून त्यांचा अहवाल सादर केलेला आहे. सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाच्या कार्यक्षेत्रातील अभियांत्रिकी महाविद्यालयांसंदर्भातील अहवाल मा. संचालक, तंत्र शिक्षण यांचेकडून विद्यापीठास सादर करण्यात आलेला आहे. सदर

अहवालामध्ये देखील अनेक महाविद्यालयांमध्ये शिक्षकी पदे भरण्यात आलेली नसल्याची बाब आढळून आलेली आहे. सदर बाब गंभीर आहे.

गेली अनेक वर्षे तात्पुरत्या स्वरूपात शिक्षकी पदे भरण्याची कार्यवाही ही संपूर्ण वर्षभर महाविद्यालयामध्ये करण्यात येते. रिक्त शिक्षकी पदे तात्पुरत्या स्वरूपात भरण्याचे कारण म्हणजे शैक्षणिक सत्र सुरू झाल्यापासून विद्यार्थ्यांचे शैक्षणिक नुकसान होऊ नये म्हणून परिनियम क्र. ४१५ (३) अनुसार तात्पुरती पदे भरण्याबाबत त्वरीत कार्यवाही महाविद्यालयांकडून होणे आवश्यक आहे. तथापि, गेली अनेक वर्षे काही महाविद्यालये ही तात्पुरत्या स्वरूपातील शिक्षकी पदे भरण्यासंदर्भातील कार्यवाही वर्षभर तसेच मार्च/एप्रिल पर्यंत करतात असे आढळून आलेले आहे. मार्च/एप्रिल मध्ये तात्पुरती पदे भरून ती त्या शैक्षणिक वर्षासाठी दाखवली जातात. याचा गंभीर परिणाम महाविद्यालयीन विद्यार्थ्यांच्या शिक्षणावर होत आहे.

उपरोक्त सर्व बाबींचा विचार करता सर्व संलग्नित महाविद्यालये / मान्यताप्राप्त संस्था यांना खालीलप्रमाणे सूचना करण्यात येत आहे की,

१) ज्या महाविद्यालयांना /संस्थांना कायमस्वरूपी पदे भरण्यासाठी शासनाच्या मागासवर्ग कक्षाकडून बिंदू नामावलीनुसार पद निश्चिती करून मिळालेली आहे अशा सर्व महाविद्यालयांनी /संस्थांनी जाहिरात देऊन विद्यापीठ निवड समितीमार्फत रिक्त पदे भरण्यासंबंधीची निवड प्रक्रिया पूर्ण करून शिक्षक मान्यतेचे प्रस्ताव ऑनलाईन पद्धतीने या विभागाकडे पाठवावेत.

२) संलग्नित अल्पसंख्यांक महाविद्यालये / मान्यताप्राप्त संस्थांना आरक्षण व बिंदू नामावलीची कोणतीही प्रक्रिया लागू नसल्याने त्यांनी प्राचार्य व शिक्षकांची पदे शैक्षणिक वर्ष २०१६-१७ पासून कायमस्वरूपी भरण्यासंबंधी कार्यवाही करण्यात यावी तसेच प्राचार्य पदाच्या अतिरिक्त कार्यभाराची मान्यता व शिक्षकांची शैक्षणिक वर्षापुरतेचे मान्यतेचे प्रस्ताव स्वीकारले जाणार नाहीत.

३) जी पदे एका सत्रासाठी अथवा केवळ एका वर्षासाठी तात्पुरत्या स्वरूपात परिनियम क्र. ४१५ (३) नुसार भरावयाची आहेत अशी पदे शैक्षणिक वर्षासाठी तात्पुरत्या स्वरूपात नेमणुका करावयाच्या असल्यास असे प्रस्ताव शैक्षणिक वर्ष २०१६-१७ पासून प्रतिवर्षी दि. १ जून ते दि. ३० सप्टेंबर पर्यंतच विद्यापीठाकडून स्वीकारण्यात येतील व सदर कालावधीत स्थानिक निवड समितीचे अहवाल व स्थानिक निवड समितीमार्फत आलेले शिक्षक मान्यतेचे प्रस्ताव स्वीकारण्यात येतील.

४) यापूर्वी निर्गमित केलेल्या परिपत्रकानुसार निवड समिती अहवाल ७२ तासांचे आत व निवड समितीमार्फत नियुक्त झालेल्या उमेदवारांचे प्रस्ताव रूजू दिनांकापासून १ महिन्याचे आत ऑनलाईन पद्धतीने तसेच हार्डकॉपी रूजू दिनांकापासून १ महिन्याचे आत या कार्यालयास प्राप्त होणे आवश्यक आहे. त्यानंतर प्राप्त झालेले स्थानिक निवड समितीचे अहवाल व प्रस्ताव स्वीकारण्यात येणार नाहीत.

कळावे,

आपला,

संचालक
(म.वि.वि.मं.)